महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ३०८ वा | दिनांक : ०७/१०/२०२५ | वार : मंगळवार

पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीचा 'दादा' कोण? : हर्षवर्धन सपकाळ

अमरावती : पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवरून कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच भाजप नेते व मंत्री चंद्रकांत पाटील यांच्यावर निशाणा साधला आहे. पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीला बळ देणारा 'दादा' कोण? असा सवाल करत सपकाळ यांनी पवारांवर टीका केली आहे. तर गुंड नीलेश घायवळला चंद्रकांत पाटलांची मदत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे. कॉंग्रेसच्या अमरावती विभागाच्या आढावा बैठकीसाठी अकोला येथे आले असता हर्षवर्धन सपकाळ बोलत होते.

एकनाथ शिंदे यांचे मोठेपण होऊ नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आनंदाचा शिधा योजना बंद करण्याचा निर्णय घेतल्याचा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. तसेच पुढे बोलताना ते म्हणाले, यानंतरचा टप्पा हा लाडकी बहीण योजना बंद करण्याचा राहणार आहे.

हर्षवर्धन सपकाळ पुण्यातील गुन्हेगारीवर बोलताना म्हणाले, पुण्याच्या ससून हॉस्पिटलमध्ये ड्रग्स विकणाऱ्याला कोणी मदत केली? हे महाराष्ट्रासमोर उघड आहे. पुण्यामधील वाढती गुन्हेगारी आणि कोयता गॅगच्या पाठीमागे कोणता 'दादा' आहे? हे देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर करावे. पुण्यातील गुन्हेगारीला भाजप आणि अजित पवारांची राष्ट्रवादी जबाबदार आहे, या आमच्या आरोपांवर शिंदे गटाच्या धंगेकरांच्या आरोपांमुळे शिक्कामोर्तब होत आहे.

तसेच लाडकी बहीण योजना बंद होण्याच्या मार्गावर आहे. आनंदाचा शिधा बंद करण्याचा निर्णय त्याचाच एक भाग आहे. आनंदाचा शिधा बंद करण्यामागे एकनाथ शिंदेंचे नाव होऊ नये, म्हणून देवेंद्र फडणवीस यांनी ही योजना बंद केल्याचा दावा हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.

बीडच्या जेलमध्ये धर्मांतराचे काम : गोपीचंद पडळकर

सांगली : भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी आता बीडचे कारागृह अधीक्षकांवर गंभीर आरोप केले आहेत. बीडच्या जेलमध्ये धर्मांतराचे काम होते, सगळ्या महापुरुषांचे फोटो काढून त्या ठिकाणी बायबलमधील श्लोक लिहिल्याचा आरोप पडळकर यांनी केला आहे. तसेच जेलमधील कीर्तन बंद करण्यात आले असून कैद्यांना धर्मांतरासाठी लाखो रुपयाचे आमिष दाखवले जात असल्याचा देखील आरोप त्यांनी केला आहे.

या संदर्भात पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत यांनी मुख्यमंत्र्यांची देखील भेट घेतली असून या प्रकरणी चौकशीची मागणी केली आहे.

गोपीचंद पडळकर म्हणाले, बीडचे जे तुरुंग अधिकारी आहेत तिकडे ते धर्मांतराचे काम करत आहेत. तिकडे छत्रपती शिवाजी महाराज आणि गणपतीची मूर्ती होती, ती काढून टाकलेली आहे. बाबासाहेब आंबेडकरांचा फोटो, महात्मा गांधींचा फोटो काढून टाकलेला आहे. ते सर्व फोटो एका खोलीत टाकलेले आहेत. जेलमध्ये सगळे बायबलमधले श्लोक लिहिले आहेत. कैदी जेलमध्ये भजन कीर्तन करायचे, ते भजन कीर्तन पूर्णपणे बंद करून टाकलेल आहे. तसेच तिकडे त्या अधिकाऱ्याला भेटायला एक पादरी भेटायला येतो. कैद्यांना तुम्ही धर्मांतर करा तुम्हाला लाखो रुपये देतो अशा प्रकारची भूमिका तुरुंग अधिकारी घेत आहेत.

तसेच बीडमध्ये सुरू असलेल्या या सर्व प्रकाराची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली असून त्याची चौकशी करावी आणि तुरुंग अधिकाऱ्याला बडतर्फ करावे अशी मागणी केली आहे. तुरुंग अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करावा आणि सीसीटीव्हीच्या आधारे तपास करावा अशी मागणी केल्याची माहिती आमदार गोपीचंद पडळकरांनी दिली.

अमित शाहांमध्येही ती धमक नाही, काटा मारणाऱ्यांची यादी जाहीर कराच : राजू शेट्टी

मुंबई : लोणी येथील शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील साखर कारखानदारांच्या काटा मारणाऱ्यांची नावे लवकरच सार्वजनिक केली जातील, अशी घोषणा केल्यानंतर राजकीय वातावरण तापले आहे. या वक्तव्यानंतर विरोधक आणि शेतकरी संघटनांनी सरकारवर दबाव वाढवला असून, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष आणि माजी खासदार राजू शेट्टी यांनी फडणवीसांना थेट आव्हान दिले आहे. शेट्टी म्हणाले, जर कारवाई करणारच असाल आणि काटा मारणारे शोधून काढलेच असतील, तर ती यादी लोकांसमोर तात्काळ जाहीर करा. शब्द नव्हे, कृती दाखवा.

शेट्टी यांनी सरकारच्या प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आपल्या फेसबुक पोस्टमधून त्यांनी फडणवीसांवर आणि भाजपवर थेट निशाणा साधला. राजू शेट्टी म्हणाले, काटा मारणारे आणि रिकव्हरी चोरणारे तुम्हीच सोबत घेऊन फिरता. तुम्ही ज्यांच्यासोबत मंचावरून हे वक्तव्य केलं, त्या तुमच्या पक्षातील पोलादी पुरुष समजल्या जाणाऱ्या अमित शहा यांच्यातही काटामारी करणाऱ्यांवर कारवाई करण्याची धमक नाही. शेट्टींच्या या विधानामुळे राज्यातील राजकीय वातावरण आणखीन तापलं आहे. त्यांनी पुढे लिहिलं, तरीही जर काटा मारणारे शोधूनच काढले असतील, तर तुमचं जे दाखवायचं आहे ते एकदा दाखवा; पण ती यादी लवकर जाहीर करा.

दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस यांनी शेतकरी मेळाव्यात साखर कारखानदारांवर टीका करताना स्पष्ट शब्दांत सांगितलं होतं की, हे कारखाने मालकांचे नाहीत, शेतकऱ्यांचे आहेत. शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार ठामपणे उभं आहे. काटामारीमुळे शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान होतं आणि त्याच वेळी कारखानदार नफ्यात राहतात, असा आरोप त्यांनी केला. तसेच, शेतकऱ्यांच्या नफ्यातून थोडा हिस्सा त्यांच्या मदतीसाठी द्यायला कोणी तयार नाही, हे अन्यायकारक आहे, असंही फडणवीसांनी म्हटले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वक्तव्यावर राजू शेट्टी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, 'काटा मारणारे व रिकव्हरी चोरणारे सोबत घेऊन फिरत आहात तुम्हीच काय तुम्ही ज्यांच्यासोबत मंचावरून हे वक्तव्य केला त्या तुमच्या पक्षाच्या पोलादी पुरूष समजल्या जाणाऱ्या अमित शहा यांच्यात देखील काटामारी करणाऱ्यांच्या वर कारवाई करण्याची धमक नाही ...!तरीही काटा मारणारे शोधूनच काढला आहात तर तुमच जे दाखवायचं आहे ते एकदा दाखवा पण ती यादी तेवढी लवकर जाहीर करा, असे आवाहन राजू शेट्टी यांनी केले आहे.

शेतकऱ्याचा काटा मारून कारखाने पैसा कमावता, पण त्यांना मदतीला तयार नसल्याचा आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारखनदारांवर केला आहे. शेतकऱ्यांना मदतीसाठी पुढे न येणाऱ्या कारखानदारांवर फडणवीसांनी रोखठोक हल्ला चढवला. तुम्ही शेतकऱ्यांचा काटा मारून पैसा जमा करता, पण शेतकऱ्याला मदत करायला तुमच्यात दानत नाही. २५ लाख रुपये द्या म्हटलं तर मागे हटता, असा थेट आरोप त्यांनी केला. सहकारी साखर कारखान्यांच्या मालकांवर अप्रत्यक्ष टीका करत फडणवीस म्हणाले की, एफआरपीतले पैसे हे शेतकऱ्याचे आहेत, आणि नफ्यातले पैसे कारखान्याचे आहेत. आम्ही शेतकऱ्यांच्या हक्काचा पैसा मागितलेला नाही. त्यांनी ठामपणे सांगितलं, तुम्ही मालक नाही, या कारखान्यांचे खरे मालक आमचे शेतकरी आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्याचे काम सरकार करणारच. नफ्यातून शेतकऱ्यांसाठी मदत निधी बाजूला काढण्यास काही कारखान्यांनी नकार दिल्याबद्दलही फडणवीसांनी तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या एफआरपीतून नव्हे, तर कारखान्यांच्या नफ्यातून मदत मागितली होती, असं त्यांनी स्पष्ट केले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ ऑक्टोबर २०२५

डॉ. वंदना जाधव पाटील यांना IETE चा "मनोरमा राठोड राष्ट्रीय मेमोरियल पुरस्कार"

छत्रपती संभाजीनगर : देवगिरी कनिष्ठ महाविद्यालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स व कम्प्युटर सायन्स विभाग प्रमुख डॉ. वंदना जाधव पाटील यांना प्रतिष्ठित IETE-श्रीमती मनोरमा राठोड राष्ट्रीय मेमोरियल पुरस्कार 2025 प्रदान करण्यात आला.

हा पुरस्कार नवी दिल्ली येथे संपन्न झालेल्या समारंभात यूपीएससीचे अध्यक्ष अजय कुमार, सीएसआयओचे संचालक डॉ. शंतनु भट्टाचार्य व IETEचे अध्यक्ष डॉ. सुनील श्रीवास्तव यांच्या शुभहस्ते डॉ.पाटील यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. वंदना जाधव पाटील या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या (पुणे) फिजिक्स व कम्प्युटर सायन्स या विषयाच्या बोर्ड ऑफ स्टडीवर सदस्य आहेत. त्यांच्या नावावर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असे एकूण २५ संशोधन लेख प्रकाशित झाले आहेत.

त्यांनी एच.एस.सी. बोर्ड पेपर सेटिंग समिती सदस्य म्हणूनही काम केले आहे. तसेच त्यांचे फिजिक्स विषयातील तीन महत्त्वपूर्ण ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

या यशामध्ये त्यांच्या पालकांचा, कुटुंबियांचा सातत्याने मोलाचा वाटा असल्याचे त्यांनी सांगितले.या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मा.आ. प्रकाशदादा सोळंके (अध्यक्ष, म.शि.प्र. मंडळ), मा.आ.सतीशभाऊ चव्हाण (सरचिटणीस म.शि.प्र. मंडळ), महाविद्यालय विकास समितीचे ज्येष्ठ सदस्य मा.पंडितराव हर्षे(अण्णा) प्राचार्य डॉ. अशोक तेजनकर, कनिष्ठ विज्ञान विभागाचे उपप्राचार्य प्रा.अरुण काटे, जेईई-नीट सेलचे संचालक प्रा.एन.जी. गायकवाड तसेच सर्व उपप्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले.

राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे एन. डी. ए. परीक्षेमध्ये यश

छत्रपती संभाजीनगर (प्रा. शिवाजी गायकवाड) : भारतीय सैन्य दलात सर्वोच्च करिअर घडविण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी व भारतीय नौदल अकॅडमी(NDA /NA) साठी केंद्रीय लोकसेवा आयोगातर्फे १४ सप्टेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी च्या १५६ व्या कोर्स साठी आणि भारतीय नौदल अकॅडमीच्या ११८ व्या कोर्ससाठी परीक्षा घेण्यात आली होती.

या परीक्षेमध्ये राष्ट्रमाता इंदिरा गांधी सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी ऋग्वेद कुलकर्णी या विद्यार्थ्याने यश प्राप्त केले असून त्याची एस.एस.बी मुलाखतीसाठी निवड झाली आहे. त्याच्या यशासाठी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष अॅड .संजयजी राठोड , उपाध्यक्षा सौ. संगीताताई राठोड, सचिव श्री.गजानन राठोड यांनी स्वागत केले असून विद्यार्थ्याने आपल्या यशाचे श्रेय शाळेचे कमांडट लेफ्टनंट कर्नल श्री. संजय सोनवणे साहेब, प्राचार्य श्री.निखिल राठोड, उपप्राचार्य डॉ. सोळंकी सर ,डॉ. पडघान सर ,पर्यवेक्षक श्री.बोरेकर सर व कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग यांना दिले आहे.त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातून त्याचे कौतुक होत आहे.

१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा)
विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित
मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.
बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

१३६ वी वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, त्रिरत्न बुद्ध विहार व दि ऑल इंडिया नाग असोसिएशन (आईना) च्या संयुक्त विद्यमाने त्रिरत्न बुद्ध विहार, सह्याद्री नगर, N-5, सिडको, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र येथे "मला धर्म जास्त प्यार आहे आणि त्यासाठीच मी माझी शक्ती वेचणार आहे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त सदरील प्रासंगिक विषयावर १३६ वी वैचारीक प्रबोधनात्मक कार्यशाळा ५ ऑक्टोबर २०२५ ला संपन्न झाली.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, आज आपण १३६ व्या कार्यशाळेत चर्चा करीत असताना आपल्या समाजाची स्थिती ३६ च्या आकडया प्रमाणे झालेली आहे. ज्यामुळे एकाच विचारधारेला माणणारे कार्यकर्ते परस्परांचे तोंड पाहायला तयार नाहीत. तरी 69 वा धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा करीत असताना 69 या इंग्रजी आकड्यातील दोन्ही अंक परस्पराकडे बघून हसताना दिसत आहेत. ती परिस्थिती आपल्या समाजात कधी निर्माण होईल? यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. समाज जीवनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असे म्हटल्याचा प्रचार केला जातो. मात्र आपण हे लक्षात घेतले पाहिजे की ९ मार्च १९२४ ला मुंबईच्या दामोदर हॉलमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी "Educate, Agitate and Organise" अर्थात सुशिक्षित करा, संघर्ष करा आणि संघटित व्हा म्हणजे सुशिक्षित झाल्यावर संघटित होण्यासाठी संघर्ष केला पाहिजे आणि संघटित झाल्यावर हक्क अधिकारासाठी संघर्ष केला पाहिजे असे म्हटले होते. परंतु आपण तसे न केल्यामुळे आपला समाज संघटित होऊ शकलेला नाही. परिणामी संघर्षाला फारसे यश प्राप्त होत नाही. तसेच शिकल्या सवरलेल्या लोकांनी डॉ. आंबेडकरांना धोका दिला आहे, असेही म्हटले जाते. मात्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तसे म्हटलेले नाही तर १८ मार्च १९५६ ला आग्र्याच्या रामलीला मैदानावर दिलेल्या भाषणात त्यांनी अस्पृश्यांच्या घराघरात ज्ञानगंगेचा प्रवाहने नेणे, सरकारी नोकऱ्यांमध्ये त्यांना व्यापक प्रतिनिधी मिळवून देणे व खेड्यापाड्यातील अस्पृश्य जनतेची सर्वांगीण सुधारणा करणे हे त्यांच्या मागील पंचवीस वर्षातील राजकारणाचे उद्दिष्ट असल्याचे स्पष्ट केले होते. याचा प्रचार प्रसार करून शासनकर्ती जमात होण्यासाठी प्रशिक्षित कार्यकर्त्यांची आवश्यकता असल्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या संदेशाप्रमाणे "ट्रेनिंग स्कूल फॉर एंट्रन्स टु पॉलिटिक्स" चालविण्यासाठी सर्व पक्ष, संघटन, संस्थांनी प्रयत्न केले पाहिजेत. करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑक्टोबर १९५६ ला नागपूरच्या श्याम हॉटेलमध्ये मला राजकारणापेक्षा धर्म जास्त प्यारा आहे आणि त्यासाठीच मी माझी सक्ती वेचणार आहे. असे म्हटले होते याची करिता आपण माणूसकीयुक्त समाज निर्माण करण्यासाठी आपली शक्ती पणाला लावली पाहिजे. याची जाणीव ठेवून फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन निरंतरपणे कार्यरत आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना सामाजिक कार्यकर्त्या, लेखिका आर. बी. बनसोडे म्हणाल्या की, इतिहासात आपली फार वाईट अवस्था होती. आपली परिस्थिती सुधारण्यासाठी भारताचे संविधानात तरतुदी केलेल्या आहेत, त्याचा आपण लाभ घेतला पाहिजे. शिक्षणापासून वंचित ठेवण्यासाठी आपणास दर्जेदार शिक्षण नाकारले जात आहे, करिता आपण जागृत राहिले पाहिजे.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष एस. एस. बोरकर म्हणाले की, धम्मासाठी जीवन समर्पित आणि व्यतीत केले पाहिजे. वर्तमानातील धम्माच्या स्थितीला उपासक जबाबदार आहेत. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ ला आपणास धम्मचक्र प्रवर्तन दिनी धम्माची दीक्षा दिली. त्यांना सारा भारत बौद्धमय करायचा होता. करिता त्यांनी शिका, संघटित व्हा, संघर्ष करा असा नारा दिला होता. तर शिकलेल्या लोकांनी मला धोका दिलेला आहे असेही म्हटले होते. करिता आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पक्ष संघटन संस्था चालविल्या पाहिजेत.

याप्रसंगी डॉ. व्ही. एच. कांबळे म्हणाले की, जबाबदार उपासक निर्माण न झाल्याने सर्वत्र धम्माची वाईट स्थिती आहे. बेरोजगारीचे प्रमाण वाढत असल्याने शिकून तरी काय करायचे? असा विचार करून गरिबा घरची मुले शिक्षणापासून वंचित राहत आहेत. मिठूसिंग बहूरे म्हणाले की, बाबासाहेबांना विरोध असताना सुद्धा त्यांनी विपरीत परिस्थितीत कार्य केले आहे. आपण भारताचे संविधानाप्रमाणे समाज निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. रमेश खडसे म्हणाले की खाजगीकरणाच्या विरोधात आंदोलने केली पाहिजेत. महादेव डांबरे म्हणाले की विषय धार्मिक वाटत असला तरी याचा संबंध हा समाज व राजकारणाशी आहे. हे भाषण म्हणजे आयुष्यातील संपूर्ण चळवळीचा सारांश आहे. जी. एस. दोडवे म्हणाले की, आवड असेल, तिथे सवड मिळते. तरी सवड काढून कार्यक्रमाला आले पाहिजे. सत्य स्वीकारण्यासाठी असत्य सोडावे लागेल. डॉ. डी. एन. जाधव म्हणाले की, भारतीय बौद्ध महासभेच्या उद्देशावर आपण कार्य केले पाहिजे.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प अर्पण करून त्रिरत्न बुद्ध विहार समितीच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. पंचशील त्रिसरणाने सुरुवात करण्यात आली. सूत्रसंचालन अॅड. विलास रामटेके तर प्रास्ताविक डॉ. रमेशचंद्र धनेगावकर व आभार महादेव डांबरे यांनी व्यक्त केले. या कार्यशाळेला बी. बी. मेश्राम, अॅड. विलास रामटेके, डॉ. व्ही. एच. कांबळे, मिठूसिंग बहूरे, डॉ. रमेशचंद्र धनेगावकर, महादेव डांबरे, जे. बी. हातोले, के. पी. आढाव, आर. बी. बनसोडे, कल्पना अवचरमल, चंद्रकांत मस्के, रमेश खडसे, जी. एस. दोडवे, एस. एस. बोरकर, डॉ. डी. एन. जाधव, व्ही. टी. शिरसाट, प्रा. श्रीमंत कांबळे इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.शब्दांकन : बी. बी. मेश्राम, संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.संपर्क : ८९८३०८२१२८ (Wh), ९४२१६७८६२८ (C) circumference1968@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ ऑक्टोबर २०२५

विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धेचे बक्षीस वितरण समारंभ

देवगांव (रंगारी) : श्री आसारामजी भांडवलदार महाविद्यालय, देवगाव रंगारी येथील इतिहास विभाग अंतर्गत हैदराबाद मुक्ती संग्राम दिनानिमित्त विद्यापीठ स्तरीय आंतर महाविद्यालयीन वैचारिक लेख स्पर्धेचे आयोजन केले जाते. या स्पर्धेचे हे 19 वे वर्ष असून यात प्रथम क्रमांक कुमारी पायल कांबळे, कला महाविद्यालय बिडकीन, द्वितीय क्रमांक अरबाज शेख, आसारामजी भांडवलदार महाविद्यालय देवगाव रंगारी, तृतीय क्रमांक (विभागून) पल्लवी जंजाळ, शिवाजी महाविद्यालय कन्नड, तृतीय क्रमांक शेख निहाकत, मौलाना आझाद महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर, प्रोत्साहनपर जोहरा अख्तर खान, वसंतराव नाईक महाविद्यालय छत्रपती संभाजीनगर, प्रोत्साहन पर कु. कोमल हिवराळे आ.भा. महाविद्यालय देवगाव रंगारी.

सदरील विद्यार्थ्यांचा यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. सय्यद मुजीब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र व गुलाब पुष्प देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला संयोजक प्रा. डॉ. विनोद बोरसे यांनी हैदराबाद राज्याचा पूर्व इतिहास सांगून या स्पर्धेविषयीची रूपरेषा मांडली होती.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. सय्यद यांनी या मुक्ती संग्रामातील विविध घटनांचा संदर्भसह आढावा घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच कन्नडचे ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक काकासाहेब देशमुख यांचा हैदराबाद मुक्ती संग्रामातील सहभागा बद्दलचा लघुपट ही दाखवण्यात आला होता.

या कार्यक्रमाचा अध्यक्ष समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नवनाथ आघाव यांनी केला. सूत्रसंचालन कु. शितल बोर्डे हिने तर आभार इतिहास विभाग प्रमुख डॉ. कृष्णा मालकर सर यांनी मानले होते. या कार्यक्रमास डॉ. उबाळे, डॉ. खुणे, डॉ. जाधव, डॉ. गोपाळ, डॉ. गोरे, डॉ. तडवी तसेच मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी सहभागी होते.

गुजरात मधील जांबुघोडा येथील महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रतिनिधी मंडळांनी बारवाले महाविद्यालयातील शैक्षणिक उपक्रमाचा घेतला आढावा

जालना : गुजरातमधील जांबुघोडा, जिल्हा पंचमहाल, येथील जोरिया परमेश्वर कला व विज्ञान महाविद्यालयातील प्राचार्य सी.बी. रथावा, प्रा. निशांत परमार, प्रा. प्रकाश परमार, प्रा. पार्थ दवे यांच्या प्रतिनिधी मंडळाने आज सोमवार 06 ऑक्टोबर 2025 रोजी शैक्षणिक संवाद साधला. गुजरात सरकारच्या शिक्षण विभागाने उच्च शिक्षणातील गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रारंभ केला असून या योजने अंतर्गत या महाविद्यालयाच्या प्रतिनिधी मंडळाने आज भेट दिली.यावेळी प्रा. राजक्रांती वलसे यांनी महाविद्यालयातील विविध उपक्रमाचा आढावा घेतला. या भेटीदरम्यान प्राचार्य, आयक्यूएसी टीम आणि कर्मचारी सदस्यांसोबत एक संवादात्मक सत्र आयोजित करण्यात आले होते.

यावेळी महाविद्यालयातील अध्ययन अध्यापन आणि शैक्षणिक उपक्रम यासह ग्रंथालय आणि इतर पायाभूत सुविधांची माहिती घेतली. महाविद्यालयाची गुणवत्ता वाढविण्यासाठी नॅकचे मानांकन मिळविणे आता गरजेचे झाले आहे. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाने शैक्षणिक प्रगतीसाठी विविध प्रकारे प्रयत्न सुरू केले असून नॅकचा "अ" दर्जा मिळविला आहे.

या वाटचालीची माहिती घेण्यासाठी गुजरात राज्यातील या महाविद्यालयातील प्राचार्य आणि त्यांचे सहकारी आज भेटीसाठी आले होते.ही शैक्षणिक भेट यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. कविता प्राशर, अंतर्गत गुणवत्ता हमी केंद्राचे डॉ. कल्याण कुंभार यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक विद्यालय मुकुंदवाडी शाळेतील मुख्याध्यापक व वर्गशिक्षिका यांच्या प्रयत्नामुळे अनुपस्थित विद्यार्थ्यांची शाळा सुरू

छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : मनपा शाळा मुकुंदवाडी या शाळेतील विद्यार्थिनी आरती दिलीप गायकवाड ही विद्यार्थिनी शाळा सुरू झाल्यापासून शाळेत येत नसल्याने वर्ग शिक्षिका सुरेखा आक्षे मॅडम यांनी विद्यार्थिनीला कॉल करण्यास सांगितले , सावित्री कंट्रोल रूम मधील समुपदेशक भिमा हिवराळे यांनी तिला व तिच्या आईला कॉल करून विचारणा केली असता असे कळले की , ही विद्यार्थिनी 9 वी नापास झालेली आहे.

तिला शाळा शिकण्याची आवड आहे पण विद्यार्थिनीला टी . बी ची लागण आहे व तब्येत ठीक नसल्याने मागच्या वर्षी 9 वी चे पेपेर दिले नाही.

तिच्या आईचे म्हणणे होते की ,तिला टी .बी ची लागण झाल्यामुळे आम्ही तिला शाळेत पाठवले नाही ,कारण तिच्या मुळे इतर मुलांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होऊ नये म्हणून.या वर्षी तिला 9 वी चे पेपर घरी सोडविण्यासाठी देण्यात आले आहे . आणि आरतीला 9 वी पास करून थेट 10 वी बोर्ड परीक्षेसाठी तिची तयारी करून घेण्यात येत आहे. आरतीचा 10 वी परीक्षेचा फॉर्म भरून ती परीक्षा देणार आहे . आज दिनांक 06/10/2025 रोजी शाळेतील केंद्रीय मुख्याध्यापक श्री चौधरी सर , कार्यक्रम आधिकारी श्री सांगळे सर तसेच सावित्री कंट्रोल रूम मधील समुपदेशक भिमा हिवराळे , साकिब शेख , शाळेतील शिक्षिका सुरेखा आक्षे मॅडम , शिल्पा मालोदे मॅडम यांनी आरतीला भेट देऊन दिला 9 वी चे पेपर व 10 वीचे पुस्तक अभ्यास करण्यासाठी दिले .

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी.सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अॅण्ड प्रिंटर्स

डॉ.बा.आं.म.विद्यापीठ गेटजवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.

मो. 8087880274,8956362639, 9270446603, 9405109103

डी.टी.पी. (मराठी, हिंदी, इंग्रजी)

- प्रोजेक्ट रिपोर्ट
- डेझर्टेशन
- पीएच.डी./एम.फिल.थेसिस
- कलर प्रिंट
- डी.एड.,एम.एड.प्रोजेक्ट
- स्कॅनिंग
- स्पायरल व हार्ड बायडींग
- लॅमिनेशन

महाराष्ट्रातील सर्वच विद्यापीठाच्या 1300 पेक्षा जास्त पीएच.डी. 1500 एम.फिल., 4000 हून अधिक डेझर्टेशन्सचा अनुभव, कुशल ऑपरेटर्स, लाईट गेल्यास इन्व्हर्टरची सोय असलेले मराठवाड्यातील नं. 1 चे डी.पी.पी. सेंटर

अनुभव नसलेल्यांकडे जाऊन मानसिक व आर्थिक त्रास करून घेण्यापेक्षा.. अनुभवी ऑपरेटर्सकडून अचूक व उत्कृष्ठ कामासाठी अवश्यक संपर्क साधा.

Contact No.- 8956362639 / 8087880274

Email - sahilcomputer05@gmail.com

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ ऑक्टोबर २०२५

डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' कथासंग्रहास राज्य साहित्य पुरस्कार

बीड : मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे यांच्या वतीने दिला जाणारा प्रतिष्ठीत राज्यस्तरीय श्रीस्थानक साहित्य पुरस्कार शिरूरचे साहित्यिक डॉ. विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या कथासंग्रहास ठाणे येथे सुप्रसिद्ध साहित्यिक नीरजा आणि महाराष्ट्र राज्य ग्रंथ संचालनालयाचे सहायक संचालक प्रशांत पाटील यांचे हस्ते दि. ५ रोजी सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला.

वि.ल. भावे यांनी एकशे तीस वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या ग्रंथ संग्रहालयाच्या वतीने उत्कृष्ट मराठी साहित्यकृतीसाठी राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान केले जातात. डॉ विठ्ठल जाधव यांच्या 'रानरांगूळ' या वास्तववादी कथासंग्रहास सन २०२४ साठी मेधा दामोदर रोमण पुरस्कृत पुरस्काराने गौरविण्यात आले.

साहित्यिक नीरजा म्हणाल्या की, बदलते वातावरण आपल्या संस्कृतीला मारक आहे. आम्ही सांगतो तेच लिहा ही प्रवृत्ती घातक आहे. तर डॉ. विठ्ठल जाधव यांनी माणूस केंद्रीभूत ठेवून माणूसपणाचे प्रश्न हाताळतो.

आम्ही जगतो तेच मांडतो असे पुरस्कारास उत्तर देताना म्हटले. पुरस्कार स्वरूप मानपत्र, पाच हजार, ग्रंथभेट देऊन जाधव यांना सन्मानित केले. यावेळी ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष विद्याधर ठाणेकर, महाराष्ट्र राज्य शासन ग्रंथ निवड समितीचे सदस्य चांगदेव काळे, बालसाहित्यिक बबन शिंदे, नागू वीरकर, मोतीराम राठोड, संकेत जाधव यांचेसह राज्यातील लेखक, कवी, रसिक उपस्थित होते.

व्ही. एन. पाटील लॉ कॉलेजची मान्यता तात्काळ रद्द करून प्राचार्यावर कायदेशीर कारवाईची मागणी

छत्रपती संभाजीनगर : विद्यार्थ्यांकडून नियमबाह्य पद्धतीने शुल्क वसूल करणाऱ्या व्ही. एन. पाटील लॉ कॉलेजची मान्यता तात्काळ रद्द करून प्राचार्यावर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी.आज सम्यक विद्यार्थी आंदोलन चे जिल्हाध्यक्ष अक्रम खान यांच्या नेतृत्वाखाली उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. वाघमारे मॅडम यांना प्रत्यक्ष भेटून निवेदन सादर करण्यात आले.

या निवेदनामध्ये व्ही. एन. पाटील लॉ कॉलेज, औरंगाबाद येथे विद्यार्थ्यांकडून प्रॅक्टिकल एक्झाम व इंटर्नल एक्झामच्या नावाखाली सक्तीने शुल्क वसूल केल्याची तक्रार करण्यात आली असून, अशा नियमबाह्य प्रकारांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

या प्रसंगी अमोल बोर्डे , अमोल घुगे व संबंधित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

छत्रपती संभाजीनगर च्या आदिवासी ठाकर समाजाने आमदार दौलत दरोडा यांना दिले विविध मागण्यांचे निवेदन

खुलताबाद (सनिराम गावंडे) दि.५ आक्टोंबर २०२५ रोजी शहापूरचे आमदार दौलत दरोडा तथा अध्यक्ष सह्याद्री आदिवासी ठाकर-ठाकूर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य तथा समिती प्रमुख आदिवासी अनुसूचित जमाती कल्याण समिती महाराष्ट्र शासन (राज्य मंत्री दर्जा) यांची प्रशासकीय कामकाजा संबंधित येणाऱ्या विविध प्रकारच्या मागण्यांचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील आदिवासी ठाकर समाजाने दिले निवेदन.

निवेदनामध्ये वनहक्क जमिनी व काही प्रमुख स्ट्रीट लाईट, स्मशान भूमी, कृषी संजीवनी वनधन समिती आदिवासी विद्यार्थ्यांची शैक्षणिक बाबतीत शिष्यवृत्ती वसतिगृहात होणारी नुकसान जि प शाळेतील शालेय पुरक पोषण आहाराचे अपहार बाबत आणी सामाजिक वैयक्तीक कामासाठी सदिच्छा भेट घेतली.

डावीकडून उजवीकडे आसाराम कातोरे,..... विकास ,गंगाराम मेंगाळ, सरीचंद दोरे आमदार दौलत दरोडा साहेब दुबळीराम पथवे,सुधाकर मेंगाळ साहेब सो.अलका मेंगाळ कोंडिराम आगीवले सनिराम गावंडे व मधे परिवार शिपघाट यांचा सहभाग होता यावेळी महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख तथा ठाणे जिल्हा अध्यक्ष: सह्याद्री आदिवासी ठाकर ठाकूर समाज उन्नती मंडळ महाराष्ट्र राज्य श्री. जानू हिरवे साहेब यांचे मुख्यत्वे करुन मार्गदर्शन लाभले.

इत्यादी मागण्यांचे निवेदन जिल्हा अध्यक्ष श्री सरीचंद दोरे यांनी दरोडा साहेब यांना दिले. महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली 'कृषी समृद्धी योजना' ही शेती क्षेत्रातील पायाभूत सुविधांच्या विकासासाठी आहे, ज्यात पुढील ५ वर्षात ₹ २५,००० कोटींची गुंतवणूक केली जाते.

या योजनेचे मुख्य उद्दिष्ट भांडवली गुंतवणूक वाढवणे, उत्पादन खर्च कमी करणे, उत्पादकता वाढवणे, पिकांमध्ये विविधता आणणे आणि शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण करणे हे आहे. यामध्ये शेततळी, सूक्ष्म सिंचन, गोदामे आणि कृषी यंत्रांसाठी निधी दिला जातो.वन धन योजना ही प्रधानमंत्री आवास विकास मंत्रालय व TRIFED यांच्या संयुक्त उपक्रमातून आदिवासी समुदायाचे जीवनमान सुधारण्यासाठी तसेच जंगल उत्पादनांचे मूल्यवर्धन करून आदिवासींचे उत्पन्न वाढवण्यासाठी सुरू केली आहे.

महाराष्ट्रात ही योजना आदिवासींना कौशल्य प्रशिक्षण, क्षमता निर्माण व बाजारपेठेशी जोडणी करण्यावर लक्ष केंद्रित करते. ही योजना आदिवासींना रोजगारासाठी शहराकडे होणारे स्थलांतर थांबवून गावातच रोजगाराच्या शाश्वत संधी निर्माण करते.या योजने अंतर्गत येणाऱ्या योजनांची माहिती दिली त्याचबरोबर दौलत दरोडा यांनी मुलांना नुकत्याच होणा-या नोकर पदभरती मध्ये अभ्यास सराव करुन फॉर्म भरण्याचे केले आव्हान.

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए
मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ ऑक्टोबर २०२५

कोजागिरी

मरगळलेल्या मनाला
तजेला मिळे नवा
वाटते रोज रोज
कोजागिरी सण हवा

केशरी दुधात
चंद्राचे प्रतिबिंब
थंडीच्या गारव्यात
मन होई धुंद

काव्यमैफिलीत बहरतो
मनातला कप्पा
सुख दु:खाच्या रंगती
मनमोकळ्या गप्पा

निळ्या आकाशाला
चांदण्यांची खडी
केशरी बदामी दुधाला
अमृताची गोडी

शितल प्रकाशात
मित्र जमली सारी
एकता व सलोखा
शिकविते कोजागिरी

- रवींद्र चालीकवार
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

माय पुरात वाहिली

असा कसा आला पूर
लावी जीवाला रे घोर
माय पुरात वाहिली
मागं उरली लेकरं..

सर्जा राजा बापासंगे
कष्ट करी वावरात
होता अतिवृष्टी गेले
जीवानिशी चिखलात..

कृष्णा अन् ही कोयना
जरी माय ती जगाची
आज सोडुनी मर्यादा
झाली काळ या जीवांची..

गेले वाहून पुरात
घरदार गुरंढोरं
जिवापरी जपलेला
सारा भिजला संसार..

गाई सोबत खळ्यात
होते वासरू गोजीरे
कोप होता निसर्गाचा
सांगा काय मागे उरे?

तरी ओसरता पूर
घेऊ हातामध्ये हात
लढू पुन्हा हिंमतीने
देऊ संकटास मात..

ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

ज्ञानेश्वर विद्यालयाच्या निशांत गहिरेची विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड!

छत्रपती संभाजीनगर : ज्ञानेश्वर विद्यालयाचा विद्यार्थी निशांत गहिरे याची विभागस्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

निशांत गहिरे सध्या वर्ग दहावीत शिकत असून, त्याने स्पर्धेत ९२ किलो वजनी गटाखाली ग्रीको कुस्तीमध्ये सहभाग घेतला होता. तो हनुमान व्यायाम शाळा, बेगमपुरा येथे कुस्तीचे नियमित प्रशिक्षण घेतो.

निशांतच्या या यशामागे विद्यालयातील मान्यवरांचे मोठे परिश्रम आहेत:मुख्याध्यापिका: डॉ. संध्या मोरे पर्यवेक्षक: श्री. संभाजी तांगडेज्येष्ठ शिक्षिका: श्रीमती मंगल पवारक्रीडा विभाग प्रमुख: श्री. नितीन भारती निशांतच्या या शानदार कामगिरीबद्दल विद्यालयीन व्यवस्थापन, सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्याचे अभिनंदन केले आहे आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत!

जायकवाडी, पैठण व परभणी येथील अधिक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना बडतर्फ व निलंबित करुन मालमत्ता जप्त करण्याची महाराष्ट्र रिपब्लिक पक्षाच्या वतीने राहूल वडमारे यांची मागणी

छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र रिपब्लिक पक्षाच्या वतीने तक्रार करण्यात येते की, अधिक्षक अभियंता समाधान सब्बीनवार, प्रशांत जाधव कार्यकारी अभियंता यांनी पैठण व परभणी येथील कार्यकारी अभियंता यांना हाताशी धरुन २०११ ते २०२४ या कालावधीत संगनमाने १५० कोटीचा महाघोटाळा केला आहे, त्यांनी बोगस टेंडर व बिले बनवून आर्थिक घेटाळा करून पैशांची अफरातफर केली आहे.

जायकवाडी या मराठवाडयातील सगळ्यात मोठ्या धरणावर १) मुख्य धरणावर १५ कोटी २) जायकवाडी डावा कालवा किमी ० ते २५ कीमी ४५ कोटी ३) मॅकॅनिकल गेट दुरुस्ती धरण चाऱ्या व बंधारे ३० कोटी ४) छोटया व मोठ्या चाऱ्या वितरीका क्रमांक ते ४५, ३० कोटी ५) कालव्यांची सर्व्हेक्षण कामे १५ कोटी ६) जायकवाडी उद्यान १० कोटी ७) कर्मचाऱ्यांचे बोगस टी.ए. बिल ०५ कोटी एकूण १५० कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे.श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता यांनी जाधव कार्यकारी अभियंता, पैठण व जोशी कार्यकारी अभियंता जायकवाडी विभाग परभणी यांच्यावर दबाव आणून सर्व्हेक्षणाचे बोगस अंदाजपत्रके, बीले, टेंडर मॅनेज करुन तसेच सर्वे रेकॉर्ड खोटे बनवून संगणमताने आर्थिक घोटाळा १५० कोटीचे बीले उचचली आहेत. हि सर्व कामे १०-१० लाखांची तुकडे करुन श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता यंनी ३ वर्षात जॉब नंबर ४५० मंजुर केलेले आहे.श्री समाधान सब्बीनवार यांनी, कार्यकारी संचालक यांना मंजुरीसाठी ५ टक्के, मुख्य अभियंता ५ टक्के मंत्रालयात सचिव व मंत्री यांना ५ टक्के व स्वत:साठी १० टक्के असे एकूण २५ टक्के दोन्ही कार्यकारी अभियंता जाधव व जोशी यांच्याकडून वसुल केले आहे. याप्रमाणे १५० कोटीचे ३५ कोटी गुत्तेदारा मार्फत आगाऊ घेतल्यावरच बजेट व मंजुरी गेल्या ३वर्षात सब्बीनवार यांनी दिले आहे.जायकवाडी प्रकल्पाचे श्री प्रशांत जाधव कार्यकारी अभियंता पैठण व जोशी, कार्यकारी अभियंता परभणी यांनी ० ते १२५ किमी मेन कालव्यावर व ० ते ४५ क्रमांक चाऱ्यांवर व गेट दुरुस्तीवर काहीही कामे न करता बोगस बीले मंजुर करुन तिघनी मिळून १५० कोटीचे बोगस अंदाजपत्रके, बोगस कामे, बोगस टेंडर, बोगस बीले मंजुर करून तिघांनी संगनमताने पैशाचा अपहार केलेला आहे व आर्थिक घोटाळा केलेला आहे.श्री समाधान सब्बीनवार याने गेट दुरुस्तीला जाकयवाडी प्रकल्पावर व बंधाऱ्यावर ३० कोटी बीले आपल्यसाच जवळचा गुत्तेदारावर उचलली आहे.जायकवाडी उद्यान दुरुस्तीवर थातुरमातुन काम करून १० कोटी बीले जाधव व श्री समाधान सब्बीनवार यांनी गेल्या ३ वर्षात उचलली आहेत. आर्थिक अनियमितता करत घोटाळे केले अहोत. गेल्या ३ वर्षात १५० कोटीचा भ्रष्टाचार करत यांनी कोटयावधीची जंगम मालमत्ता, चार चाकी वाहन, शेती, प्लॉट, सोने खरेदी करुन संपत्ती जमविलेली आहे. त्यांची मालमत्ता खालील प्रमाणे आहे.

१) श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता कडा यांची बेहिशोबी मालमत्तानांदेड येथे ४ मजली इमारत, ३५ एकर शेती, औरंगाबाद येथे बीड बायपास ला २ एकर जमीन, दर्गा रोड जवळ बंगला व फ्लॅट, चारचाकी इनोवा कार, बँकेच्या लॉकर मध्ये कॅश ३० लाख, पुणे येथे फ्लॅट.२) श्री प्रशांत जाधव कार्यकारी अभियंता पैठण जायकवाडी, प्रकल्प, औरंगाबाद यांची बेहिशोबी मालमत्तादेऊळगाव राजा, मेहकर, बुलडाणा येथे ८० एकर जमीन, ४ फ्लॅट, ६ दुकाने, औरंगाबाद येथे २ बंगले बीड बायपास रोडवर २ कोटचा रो हाऊस १० एकर शेती, २ चार चाकी वाहने २५ लाखाचे३) श्रीमती जोशी कार्यकारी अभियंता परभणी जायकवाडी प्रकल्प यांची बेहिशोबी मालमत्तापरभणी येथे फ्लॅट, २ प्लॉट, औरंगाबाद येथे १० एकर शेती, बंगला, फ्लॅट, व दोन दुकाने, पुण्यात स्टेशन जवळ २ फ्लॅट, २ दुकाने, बँकेत लॉकर, चारचाकी वाहने १५ लाखाचेयांनी जवळपास प्रत्येकाची ५० कोटीची मालमत्ता यांनी नौकरीच्या कालावधीत जमा केलेली आहे. संबंधीत मालमत्ता ही यांच्या जवळचे संबंध असलेल्या नातेवाइकांच्या नावावर आहे, याचे पुरावे सुध्दा वेळप्रसंगी आपणास सादर करण्यास आम्ही तयार आहेत.

करावी. यांची ए.सी.बी. सि.आय.डी. मार्फत चौकशी करावी व संबंधीत मालमत्ता ही जप्तसन २०२१ ते २०२४ या तीन वर्षात सरकारी गाडी कारचा गैरवापर करुन आपल्या खाजगी कामासाठी मुंबई-पुणे-बुलडाणा-नांदेड-नाशिक येथे जाण्यासाठी मोठया प्रमाणात खोटे लॉग बुक दाखवून कारचा गैरवापर केला आहे. खोटा प्रवास भत्ता दाखवुन तूट दाखवली आहे व आर्थिक घोटाळा करुन शासनास ५ कोटी ला बुडविले आहे.श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता कडा व प्रशांत जाधव कार्यकारी अभियंता यांचे पैठण जायकवाडी प्रकल्पाचे व परभणी येथील खालील रेकॉर्ड ताब्यात घेऊन सीबीआय/एसीबी मार्फत तात्काळ चौकशी करावी.कडा कार्यालय, पैठण व परभणी जायकवाडी कार्यालय संबंधीत सर्व गेल्या २०२१ ते २०२४ या तीन वर्ष कालावधीत अंदाजपत्रके मंजुर केलेले मोजणी पुस्तकात बिले लिहिलेले टेंडर प्रक्रिया बिलाची मागणी मंडळ कार्यालयाने मंजुर केलेल्या जॉब क्रमांकाची यादी, गाडयांचे लॉगबुक, प्रवासाची दैनंदिनी व बिले, प्रत्यक्षात साईटवरील कामाचे फोटो, व तपासणी, मालमत्ता विवरण माहिती हे सर्व रेकॉर्ड सीबीआय/एसीबी कडे दऊन तपास करावा. श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता कडा हे खुल्या जातीतील आहेत त्यांचे सर्व नातेवाईक खुल्या प्रवर्गात नांदेड जिल्हयात आहेत यांनी जातीचे खोटे प्रमाणपत्र एसबीसी विशेष मागासवर्ग मध्ये चे काढून शासनाला व एम.पी.एस.सी आयोगाला फसवणुक करुन पदोन्नती घेतलेली आहे. यांची जातीची तपासणी व जात पडताळणी ची तपासणी सिबीआय मार्फत करुन यांचे कुठलेही प्रमोशन देऊ नये व त्यांना बडतर्फ करावे. खोटया प्रमाणपत्रासाठी यांनी १० लाख खर्च करुन घेतलेले आहेत. त्यांची १०वी व १२वी ची टीसी ची तपासणी करावी यात खुला वर्ग आहे हे सिध्द होईल श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता कडा यांना दोन मुले व एक मुलगी तीन अपत्य आहेत. त्यांनी दोन मुलांची रेकॉर्डवर नोंद घेतलली आहे तरी त्यांनी पोलिसां मार्फत चौकशी करावी श्री प्रशांत जाधव श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता कडा या दोघांनी मिळून, जायकवाडी पाणीपट्टी वुसली जलाशयाची केलेली आहे. व त्या पाणीपट्टी वसुलीच्या पावत्या न फाडता गेल्या तीन वर्षात जलाशयात पाणीपट्टी वसुली मध्ये ०० -१०० एकर चे शेतकरी मालक असतांना पाणी उपसा केला असल्याची यांनी दोघांनी मिळून फक्त शेतकऱ्यांकडून पैसे घेऊन प्रत्येक वर्षी १० कोटीचा १००० हेक्टर मध्ये घोळ केलेला आहे. तीन वर्षात ३० कोटीचा घोळ करुन यांनी शासकीय रकमेचा अपहार केलेला आहे. जायकवाडी प्रकल्पावरील तीन ही अधिकाऱ्यांना १५ दिवसात तात्काळ निलंबित करून नंतर सिबीआय/एसीबी मार्फत चौकशी करावी.

प्रशांत जाधव व जोशी हे पैठण परभणी येथे जात नाही सर्व ऑफीस संभाजीनगर येथून पाहतात याची सुध्दा चौकशी करण्यात यावी.श्री समाधान सब्बीनवार अधिक्षक अभियंता कडा, प्रशांत जाधव कार्यकारी अभियंता जायकवाडी पैठण, जोशी कार्यकारी अभियंता जायकवाडी परभणी यांना १५० कोटीचे टेंडर व खोटी बिले सादर करून आर्थिक घोटाळा केल्यामुळे तात्काळ बडतर्फ करुन सिबीआय/एसीबी मार्फत चौकशी करुन यांची मालमत्ता जप्त करून तुरुंगात पाठवावे अन्यथा महामंडळा समोर आमरण उपोषण दिनांक ०५/०२/२०२४ पासुन करण्यात येईल.संबंधीत प्रकरणी आपणास वरील प्रमाणे सर्व पुरावे सादर करण्यात येतील तरी मा. महोदय आपण येत्या १० दिवसाच्या आत सर्व संबंधीतांची चौकशी करुन त्यांच्यावर फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करून निलंबित करावे अन्यथा महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने कार्यकारी संचालक गोदावरी महामंडळ संभाजीनगर येथे तिव्र स्वरुपाचे आंदोलने, उपोषणे, निदर्शने करण्यात येतील यात काही अपप्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मा. कार्यकारी संचालक साहेब, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर, व श्री समाधान सब्बीनवार, अधिक्षक अभियंता, कडा संभाजीनगर व प्रशांत जाधव, कार्यकारी अभियंता जायकवाडी, पैठण व परभणी याची गांभिर्याने नोंद घ्यावी.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ०७ ऑक्टोबर २०२५

वृद्धत्वकालीन एकाकीपणा दूर करण्यासाठी छंद आणि सकारात्मक दृष्टिकोनाची गरज : डॉ. राजेंद्र बगाटे

नाशिक (प्रतिनिधी) : यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन आणि सेवांतर्गत प्रशिक्षण कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 1 ऑक्टोबर रोजी साजऱ्या होणाऱ्या 'आंतरराष्ट्रीय वृद्धत्व दिनानिमित्त' विशेष संवाद कार्यक्रम "वृद्धत्व-एक सिंहावलोकन : समस्या व उपाय" या विषयावर यशवाणी वेब रेडिओवर आयोजित करण्यात आला होता. मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे आणि प्र-कुलगुरू प्रा. जोगेंद्रसिंह बिसेन यांच्या कल्पक मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या 14 व्या पुष्प परिसंवादात समाजशास्त्राचे आणि वृद्धत्वशास्त्राचे अभ्यासक डॉ. राजेंद्र बगाटे यांनी वृद्धत्त्वाचे सामाजिक, सांस्कृतिक, मानसशास्त्रीय आणि जीवशास्त्रीय पैलू सखोलपणे मांडले.डॉ. राजेंद्र बगाटे यांनी आपल्या संवादात सांगितले की, "वृद्धत्व ही केवळ जैविक प्रक्रिया नसून जीवनातील अनुभव, ज्ञान आणि संयमाचा साठा आहे. भारताच्या संविधानानुसार 60 वर्षांवरील व्यक्ती 'ज्येष्ठ नागरिक' म्हणून ओळखल्या जातात. या काळात शरीरातील पेशींची पुनर्निर्मिती मंदावते, हाडांची व स्नायूंची ताकद घटते, आणि ज्ञानेंद्रियांची कार्यक्षमता कमी होते; पण त्याचवेळी भावनिक परिपक्वता, सहिष्णुता आणि शहाणपणा वाढतो. या गुणांचा समाजहितासाठी उपयोग झाला पाहिजे." डॉ. बगाटे पुढे म्हणाले की, "वृद्धत्वाच्या काळात सामाजिक, आर्थिक आणि मानसिक आधाराची गरज सर्वाधिक असते. संयुक्त कुटुंबपद्धतीच्या ऱ्हासामुळे आणि शहरीकरणामुळे वृद्ध एकाकी पडले आहेत. त्यामुळे त्यांनी 'मी मी'च्या कवचातून बाहेर येऊन छंद जोपासावेत, समाजाशी संवाद वाढवावा, आणि सक्रिय जीवन जगावे. छंद जोपासल्याने मानसिक ताजेपणा टिकतो व आत्मसन्मान वाढतो."डॉ. राजेंद्र बगाटे यांनी पुढे अधोरेखित केले की, "रोगप्रतिकारक शक्ती कमी झाल्यामुळे वृद्धांनी संतुलित आहार, नियमित विहार, आणि तणावरहित जीवनशैली स्वीकारावी. सामाजिक बदल, आर्थिक आव्हाने आणि पर्यावरणीय अस्थिरतेला सकारात्मकतेने सामोरे जाणे आवश्यक आहे. स्वावलंबन ही वृद्धांच्या आत्मसन्मानाची गुरुकिल्ली आहे." डॉ. बगाटे म्हणाले की, "वृद्धांनी स्वत:ची ओळख निष्क्रियतेत नव्हे तर साक्रीयतेत शोधली पाहिजे. आरोग्याविषयी जागरूकता, सामाजिक सहभाग, नव्या तंत्रज्ञानाचे ज्ञान, संवादकौशल्य आणि सतत शिकण्याची वृत्ती या गोष्टी वृद्धत्व अधिक अर्थपूर्ण करू शकतात." या संवादाद्वारे वृद्धत्वाचे समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, आर्थिक आणि सांस्कृतिक पैलू स्पष्ट करण्यात आले. वृद्धांच्या समस्या समजून घेऊन त्यांच्या सन्मानाचे आणि स्वावलंबनाचे धोरणात्मक प्रयत्न गरजेचे असल्याचेही त्यांनी सांगितले. वृद्धांच्या समस्यांविषयी संवेदनशीलता निर्माण करण्याचा आणि समाजात सकारात्मक दृष्टिकोन वाढविण्याचा हा उपक्रम ठरला आहे.कार्यक्रमाचे संयोजन आणि निवेदन अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी केले. त्यांनी या संवाद मालिकेचे उद्दिष्ट आणि महत्त्व स्पष्ट केले. या परिसंवादाच्या यशस्वी आयोजनात श्री. राहुल पगारे यांनी विशेष परिश्रम घेतले, तर दृक्-श्राव्य केंद्राचे प्रमुख प्रा. जदीप निकम यांच्या मार्गदर्शनाखाली तांत्रिक सहाय्यक श्री. गिरीश गवळी आणि श्री. प्रकाश सापनर यांनी तांत्रिक सहकार्य केले. हा संवाद यशवाणी वेब रेडिओच्या पोर्टलवर अध्ययनार्थी व श्रोत्यांसाठी कायमस्वरूपी श्रवणासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

प्रा. डॉ. के. एम. जाधव यांची जागतिक विज्ञान क्षेत्रात भरारी स्टॅनफोर्ड-एल्सेव्हियरच्या 'टॉप २%' शास्त्रज्ञांच्या यादीत

छत्रपती संभाजीनगर: एम.जी.एम. विद्यापीठाचे एमेरिटस प्रोफेसर आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख प्रो. डॉ. के. एम. जाधव यांनी जागतिक विज्ञान जगतात आपले स्थान अधिक मजबूत केले आहे.

जगातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या स्टॅनफोर्ड विद्यापीठ (Stanford University) आणि एल्सेव्हियर (Elsevier) यांनी संयुक्तपणे जाहीर केलेल्या 'जगातील टॉप २% शास्त्रज्ञां'*च्या प्रतिष्ठित यादीत ते सलग सातव्या वर्षी (२०२०) पासून) झळकले असून, मराठवाडा विभागातून ते प्रथम स्थान टिकवून आहेत.

विज्ञान जगतातील सर्वोच्च सन्मान: जगातील १ लाख शास्त्रज्ञांमध्ये स्थान!स्टॅनफोर्ड युनिव्हर्सिटीच्या *'डिपार्टमेंट ऑफ डेटा अॅन्ड अॅनलिटिक्स'*ने सप्टेंबर १९, २०२५ रोजी ही यादी जाहीर केली आहे. जगभरातील १ लाख शास्त्रज्ञांच्या मधून, मागील वर्षाच्या आणि त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीतील कामाचा यादीसाठी अभ्यास केला जातो. यादीतील निवड ही शास्त्रज्ञांच्या संशोधनाच्या 'जागतिक प्रभावाचे' मूल्यांकन करते.या नामांकनासाठी 'कम्पोझिट इंडिकेटर' (C-score) या वैज्ञानिक निकषाचा आधार घेतला जातो. यात सायटेशन्स (उद्धरण), एच-इंडेक्स (h-index) आणि सह-लेखकांसह केलेल्या कामाचे विश्लेषण केले जाते.

डॉ. जाधव यांचे कार्य २२ वैज्ञानिक विषयक्षेत्रांपैकी (Scientific Fields) 'पदार्थ विज्ञान/भौतिकशास्त्र' या मुख्य क्षेत्रात असून, त्यांनी १७४ उप-विभागांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. तसेच इंजीनियरिंग अँड टेक्नॉलॉजी या विषयांमध्ये डॉ. के. एम. जाधव मराठवाडा विभागातून प्रथम क्रमांकावर आहे तसेच देशपातळीवर एकशे नऊ (१०९) स्थानावर आहे, आशिया खंडातून त्यांचे स्थान दोन हजार एकशे पाच (२१०५) व जागतिक स्थळावर त्यांचे स्थान आठ हजार तीनशे सहा (८३०६) म्हणजे टॉप २% आहे ही विशेष उल्लेखनीय बाब आहे.नॅनो तंत्रज्ञानात क्रांती घडवणारे संशोधन आहे .

प्रा. डॉ. जाधव यांचे संशोधन कार्य प्रामुख्याने 'फेराईट मॅग्नेटिक नॅनो पार्टिकल्स' (Ferrite Magnetic Nanoparticles) आणि क्वॉटम मटेरियल्स या विषयावर केंद्रित आहे. त्यांच्या या संशोधनातून विकसित होणाऱ्या तंत्रज्ञानाचा उपयोग थेट समाजजीवनातील गंभीर समस्यां जसे की कर्करोगावरील उपचारांसाठी, ज्यामध्ये अत्याधुनिक आणि कमी वेदनादायक पद्धती विकसित करणे.प्रदूषणाच्या समस्या बाबतं विशेषतः जल प्रदूषण कमी करण्यासाठी आणि स्वच्छ जल उपलब्ध करण्यासाठी कार्यक्षम तंत्रज्ञान विकसित करणे,ऊर्जा क्षेत्रातग्रीन हायड्रोजन (Green Hydrogen) ची निर्मिती करून ऊर्जा क्षेत्रात पुढाकार घेणे.याव्यतिरिक्त, 'हाय टीसी सुपर कंडक्टर' (High TC Super Conductor), 'फेरोइलेक्ट्रिक' आणि 'ग्लास' (Ferroelectric and Glass) यांसारख्या जटिल आणि महत्त्वाच्या विषयांमध्येही त्यांचे संशोधन सुरू आहे. संशोधनाचा जागतिक दबदबा १३,००० सायटेशन्सडॉ. जाधव यांच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावर किती मोठा प्रभाव आहे, हे त्यांच्या सायटेशन्सच्या (संशोधन कार्याचे इतर वैज्ञानिकांनी दिलेले संदर्भ) संख्येवरून स्पष्ट होते.

त्यांच्या संशोधन पेपर्सना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या नियतकालिकांमध्ये तब्बल १३,००० हून अधिक वेळा उद्धृत (cite) करण्यात आले आहे. ही आकडेवारी सिद्ध करते की त्यांचे कार्य केवळ देशातच नव्हे, तर आशिया खंडात आणि जागतिक क्रमवारीतही उच्च स्थानावर आहे. मराठवाडा विभागातील कोणत्याही वैज्ञानिकासाठी ही अभिमानास्पद कामगिरी आहे!एम जी एम .विद्यापिठाचे कुलपती मा. श्री अंकुशराव कदम यांनी प्रयोगशाळा व आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून कायम प्रोत्साहन दिले आहे.

या सर्व संशोधनामध्ये डॉ वैभव मुरूमकर ,सुदर्शन गवळी, तुकाराम सराफ ,राहुल पंडित, प्रतीक पाटील,योगेश उबाळे, सुभाष वाणी, सागर भागडे,विकास मगर,सागर राठोड,महेश कोटकर ,संदिप सोमवंशी, प्रशांत खरात, सागर शिरसाठ, पंकज खिराडे, स्मिता मोरे, भगवान टोक्शा, सहित इतर संशोधक विद्यार्थ्यांचा सहभाग आहे .डॉ. जाधव यांच्या या सातत्यपूर्ण यशाबद्दल एमजीएम विद्यापीठाचे कुलपती मा श्री : अंकुशराव कदम यांच्यासह कुलगुरू डॉ विलास सपकाळ , कुलसचिव डॉ आशिष गाडेकर व त्यांचे गुरु डॉ गोविंद बिचिले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठासहीत सर्व स्तरांमधून त्यांचे अभिनंदन होत आहे.

तालुकास्तरीय वादविवाद स्पर्धेचे शरण पाटील यांच्या हस्ते उद्घाटन

मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) : येथील प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या वतीने कै. माधवराव (काका) पाटील यांच्या नावाने तालुकास्तरीय वाद-विवाद स्पर्धेचे आयोजन सोमवारी (ता. ६) रोजी करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा व व्यक्तिमत्त्वाचा विकास व्हावा या हेतूने यंदाच्या वर्षापासून पहिली वादविवाद स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन उमरगा जनता बँकेचे चेअरमन शरण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उल्हास घुरघुरे होते. यावेळी संस्थेचे सचिव व्यंकटराव जाधव गुरुजी, संचालक प्रा. डॉ. सतिश शेळके, गोविंद पाटील, श्रीकांत बेंडकाळे, सुरेश शेळके, गणेश अंबर, प्राचार्य अशोक सपाटे, उपप्राचार्य चंद्रकांत बिराजदार, प्राचार्य सदाक वली, उपमुख्याध्यापक राधाकृष्ण कोढारे, परिवेक्षक विवेकानंद परसाळगे, काशिनाथ मिरगळे, योगेश राठोड, विलास कांटेकुरे, विजयकुमार देशमाने आदींची प्रमुख उपस्थिती होती.

या स्पर्धेत बलसुर येथील छत्रपती शिवाजी कनिष्ठ महाविद्यालयाने प्रथम क्रमांक स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख रक्कम ५००१, मुरूमच्या कला, वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाने द्वितीय क्रमांक स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख रक्कम ३००१, प्रतिभा निकेतन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाने तृतीय क्रमांक स्मृतिचिन्ह, प्रशस्तीपत्र, रोख २००१ तर प्रा. संजय गिरी यांचे आजोबा स्वातंत्र्यसैनिक यांच्या स्मरणात उत्तेजनार्थ प्रतिभा निकेतन विद्यालयातील प्रणिता सगर यास रोख ५०१ रुपये देऊन सत्कार करण्यात आला.

नूतन प्राथमिक शाळेचे सहशिक्षक बसवराज पाटील, उच्च माध्यमिक चे प्रा. उमाकांत महामुनी यांना सन्मानचिन्ह देऊन मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. प्रा. संजय गिरी, प्रा. सुधीर नाकाडे, प्रा. नारायण सोलंकर, प्रा. अजित सुर्यवंशी, प्रा. बिभीषण बंडगर, प्रा. विश्वजीत अंबर, प्रा. दयानंद राठोड, प्रा. राघवेंद्र धर्माधिकारी, प्रा. अमोल गायकवाड, प्रा. रत्नदीप वाकडे, प्रा. सलीम जमादार, प्रा. अजित राठोड, प्रा. रेखा उण्णद, प्रा. दिपक सांगळे, प्रा. सरस्वती तपसाळे, प्रा. माधवी नरगिडे, प्रा. महेश सगशेट्टी, प्रा. साक्षी महामुनी आदींनी पुढाकार घेतला.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. उमाकांत महामुनी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. सतिश रामपुरे तर आभार प्रा. अण्णाराव कांबळे यांनी मानले.